ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

**ISSN 2249-4081**
RNI.MAHMUL 02935/2011

*National Registered and Recognized*
*Research Journal Related to Higher Education for Economics & Commerce*

# GLOBAL
## ECONOMIC RESEARCH



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Role of Information Technology in Banking Sector | Dr. D. G. Ushir | 1 |
| 2 | Role of CRM in Insurance Sector | Dr. P. U. Athawale | 15 |
| 3 | संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची महिला किसान योजना | विनायक रावसाहेब वाघमारे | 21 |
| 4 | विपणनातील आधुनिक विचार प्रवृत्ती | डॉ.बालाजी नारायण देवकते | 28 |
| 5 | भारतातील विदेशी थेट गुंतवणूक - एक अभ्यास | डॉ. दिलीप अर्जुने | 32 |
| 6 | जागतिक मानवी विकास अहवाल आणि भारत | डॉ. अशोक टिपरसे | 41 |
| 7 | भारतीय अर्थव्यवस्था आणि सेवाक्षेत्र | डॉ. डी. पी. पवार | 47 |
| 8 | भारतामधील नोटाबंदी आणि त्याचे परिणाम एक अभ्यास | बबीता गणपतराव हेबारे | 50 |
| 9 | ग्रामीण महिलांच्या सामाजिक सक्ष्मीकरणात एस.जी.एस. वायची भूमिका | अविनाश विलासराव पवार | 55 |
| 10 | महाराष्ट्राच्या महसूली खर्चातील अलिकडील काळातील प्रवृती | मनिषा आसाराम गोरे | 59 |

Issue : XIII, Vol. I
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 2.86
ISSN 2249-4081
April 2017 To Sept. 2017

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
LAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
Dist.Nanded

# जागतिक मानवी विकास अहवाल आणि भारत

डॉ. अशोक टिपरसे
अर्थशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

6

## RESEARCH PAPER - ECONOMICS

**प्रस्तावना :-**

मानव विकास म्हणजे लोकांना मिळणाऱ्या संधीचा परीघ मोठा करण्याची एक प्रक्रिया होय, म्हणजेच मानवाचा केवळ आर्थिक विकासच नव्हे, तर त्यासोबतच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, मानसिक, सांस्कृतिक इ.अशा सर्व अंगानी विकास होणे म्हणजे मानव विकास होय, मानव विकास निर्देशांक ही एक बहुअंगी संकल्पना असून मानव विकास निर्देशांक हा स्थूलमानाने आयुर्मान ज्ञान प्राप्ती व चांगली राहणीमान या तीन सामाजिक घटकांची सरासरी होय. या तिन्हीची समभारीत सरासरी होय, सरासरी आर्यमान, शालेय सरासरी वर्ष, शालेय अपेक्षित वर्ष व दरडोई उत्पन्न इ.मानकांना समान महत्त्व देऊन मानव विकास निर्देशांक काढला जातो. या निर्देशांकाचे एकूण मूल्य 0 ते 1 च्या दरम्यान असून निर्देशांक जेवढा 1 या अकांच्या जवळ असेल तेवढा देशाचा विकास चांगला असतो. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) यांनी इथियोपीयाची राजधानी आदिस अबाबा येथे मानव विकास अहवाल 2015 (HDR2015) याचे प्रकाशन 14 डिसेंबर 2015 रोजी करण्यात आले.

1990 पासून दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या या अहवालाचे बोधवाक्य घ्मानव विकासासाठी कार्यड(Work for Human Development) हे आहे. यामध्ये कार्य ही संकल्पना नौकरी किंवा रोजगार या बाबीपुरती मर्यादीत नसून ती यापेक्षाही खुप व्यापक स्वरुपाची आहे.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



**मानव विकास निर्देशांकाचे घटक :-**

HDR 2015 या वर्षी एकूण 188 देशांची तुलना करुन हा निर्देशांक निश्चित करण्यात आला हा निर्देशांक तयार करत असताना पुढील तीन प्रमुख निर्देशकांचा वापर केला जातो.

| परिमाण | निर्देशक | किमान | कमाल मुल्य |
|---|---|---|---|
| 1. आरोग्य : | जन्मवेळचे अपेक्षित आर्युमान | 20 | 85 |
| 2. ज्ञानाची उपलब्धता : | शिक्षणाचे सरासरी वर्ष | 0 | 18 |
| | शिक्षणाचे अपेक्षित वर्ष | 0 | 15 |
| 3. राहणीमानाचा दर्जा : | ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न (दरडोई क्रयशक्ती PPP) | 100 | 75,000 |

**मानव विकास निर्देशांकाच्या आधारे देशांचे वर्गीकरण :-**

मानव विकास निर्देशांक अहवाल जगातील विविध राष्ट्रामधील मानव विकासाची स्थिती तपासून तुलनात्मक स्वरुपाचा निर्देशांक जागतिक क्रमांकावर म्हणजे कोणत्या क्रमांकावर आहे याची माहिती या अहवालावरुन सहज मिळणे शक्य झाले. मानव विकास निर्देशांक हा अहवाल जगातील देशांचे अतिविकसित (अतिउच्च मा.वि.), विकसित (उच्च मा.वि.), विकसनशील (मध्यम मा.वि.) व अविकसित (कमी मा.वि.) असे वर्गीकरण करण्यासाठी वापरला जातो. खालील तक्त्यात विविध देशांची HDI मुल्यानूसार चार गटात विभागी HDR-2015 या अहवालामध्ये करण्यात आली आहे. यामध्ये भारत 0.609 गुणासह मध्यम मानव विकास गटात मोडतो. भारताने मानव विकास निर्देशांकच्या क्रमवारीत गेल्यावर्षीच्या तुलनेत पाच स्थानांची प्रगती करत 130 वे स्थान पटकाविले आहे.

वरील तक्त्यात विविध गटातील देशाचा क्रमांक व मूल्य दर्शविलेले आहे. त्यानुसार अतिउच्च मानव विकास निर्देशांक (मुल्य 0.800 पेक्षा जास्त) असलेल्या देशामध्ये नॉर्वे हा देश प्रथम क्रमांकावर असून या देशाचे HDI मूल्य 0.944 इतके जास्त म्हणजे सर्वाधिक आहे. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा द्वितीय क्रमांक लागतो. देशाचे HDI मुल्य 0.935 आहे स्वित्झलँड हा देश तृतीय क्रमांकावर आहे त्याचे HDI मुल्य 0.930 आहे. तर डेन्मार्कचा चौथा क्रमांक आणि HDI मूल्य 0.923 इतके आहे.

उच्च मा.वि.गटातील राष्ट्राच्या (ज्यांचे HDI मूल्य 0.700 ते 0.799) यादीमध्ये रशिया अव्वल स्थानी आहे. देशाचे HDI मूल्य 0.798 आहे. एकूण क्रमवारीत हा देश 50 व्या क्रमांकावर आहे. ब्राझील हा देश एकूण क्रमवारी 75 व्या क्रमांकावर असून HDI मूल्य 0.755 इतके आहे. आपला शेजारी देश श्रीलंका या क्रमवारीमध्ये 73 व्या क्रमांकावर आहे, या देशाचे HDI मूल्य 0.757 इतके आहे. तर चीनचा क्रमांक 90 आहे, या देशाचे HDI मूल्य 0.727 इतके आहे.

Issue : XIII, Vol. I
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 2.86
ISSN 2249-4081
April 2017 To Sept. 2017 

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

## मानव विकास निर्देशांक (Human Development India - HDI)

तक्ता क्र. 1

| देश | रँक | मानव विकास निर्देशांक | जन्मावेळचे अपेक्षित आयूर्मान वर्षे | अपेक्षित शालेय वर्ष | सरासरी शालेय वर्ष | ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न डॉलर्स | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नॉर्वे | 1 | 0.944 | 18.6 | 17.5 | 12.6 | 649922 | अतिउच्च मा.वि. |
| ऑस्ट्रलिया | 2 | 0.935 | 82.4 | 20.2 | 13 | 42261 | अतिउच्च मा.वि. |
| स्वित्झलँड | 3 | 0.930 | 83 | 15.8 | 12.8 | 56431 | अतिउच्च मा.वि. |
| डेन्मार्क | 4 | 0.923 | 80.2 | 18.7 | 12.7 | 44025 | अतिउच्च मा.वि. |
| रशिया | 50 | 0.798 | 70.1 | 14.7 | 12 | 22,352 | उच्च मा.वि. |
| श्रीलंका | 73 | 0.757 | 74.9 | 13.7 | 10.8 | 9,779 | उच्च मा.वि. |
| ब्राझील | 75 | 0.755 | 74.5 | 15.2 | 7.7 | 15,175 | उच्च मा.वि. |
| चीन | 90 | 0.727 | 75.8 | 13.1 | 7.5 | 12,547 | उच्च मा.वि. |
| दक्षिण अफ्रिका | 116 | 0.666 | 57.4 | 13.6 | 9.9 | 12,122 | मध्यम मा.वि. |
| भारत | 130 | 0.609 | 68.0 | 11.7 | 5.4 | 5,497 | मध्यम मा.वि. |
| बांग्लादेश | 142 | 0.57 | 71.6 | 10.0 | 5.1 | 3,191 | मध्यम मा.वि. |
| नेपाळ | 145 | 0.548 | 69.6 | 12.4 | 3.3 | 2,311 | निम्न मा.वि. |
| पाकिस्तान | 147 | 0.538 | 66.2 | 7.8 | 4.7 | 4,866 | निम्न मा.वि. |
| येमेन | 160 | 0.49 | 63.8 | 9.2 | 2.6 | 3519 | निम्न मा.वि. |
| नायजर | 188 | 0.348 | 61.4 | 5.4 | 15 | 908 | निम्न मा.वि. |
| जग | | 0.711 | 71.5 | 12.2 | 7.9 | 14,301 | - |

संदर्भ :- UNDP HD Report 2015

VYAPARI EDUCATION SOCIETY'S ... COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

मध्यम मा.वि.गटातील राष्ट्रामध्ये एकूण क्रमवारीत दक्षिण अफ्रिकेचा क्रमांक 116 आहे. या देशाच्या HDI मूल्य 0.666 आहे. द.अफ्रिका हा देश ब्रिक्स सदस्य देश आहे. भारत देखील याच गटात असून देशाचा क्रमवारी 130 वा क्रमांक लागतो. भारताचे HDI मूल्य 0.609 इतके (कमी) आहे.

निम्न मानव विकास गटातील राष्ट्राचे HDI मूल्य 0.550 पेक्षा कमी आहे. या गटात आपल्या शेजारील देशाचे 140 व्या क्रमांकावर बांग्लादेश असून या देशाचे मूल्य 0.570 आहे. नेपाळ हा देश एकूण क्रमवारीत 145 व्या क्रमांकावर आहे HDI मूल्य 0.548 आहे. तर पाकिस्तान हा देश147 व्या क्रमांकावर आहे. या देशाचे HDI मूल्य 0.538 इतके आहे. सर्वात शेवटी 188 व्या क्रमांकावर नायजर हा देश आहे त्यांचे HDI मूल्य केवळ 0.348 इतके कमी आहे. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम प्रकाशित (UNDP) मानव विकास अहवाल 2015 मध्ये 188 देशांच्या मानव विकास अहवालामध्ये 49 देश अतिउच्च मा.वि.गटात, 56 देश उच्च मा.वि.गटात 39 देश मध्यम मा.वि.गटात व उर्वरित 44 देश निम्न मा.वि.गटात समाविष्ट झाले आहेत.

**मानव विकास निर्देशांकात भारत :-**

HDR - 2015 या अहवालात भारत 0.609 गुणासह मध्यम मान विकास गटात मोडतो गतवर्षीच्या म्हणजे HDR - 2014 अहवालामध्ये भारताचा क्रमांक 135 होता या तुलनेत HDR - 2015 अहवालामध्ये भारताने पाच स्थानाची प्रगती केली असून यामध्ये जन्मवेळचे अपेक्षित आयुर्मान व ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न (PPP) यांचा महत्त्वाचा वाटा आहे. शिक्षणाच्या बाबतीतील असमानतेमुळे मानवी विकास निर्देशांकात भारताचा 42.1% फटका बसला आहे. अपेक्षित शालेय वर्षामध्ये 2011 पासून सुधारणा झाली नसुन तो आकडा 11.7 वर्ष इतकाच आहे. शिक्षणाचे सरासरी वर्ष देखील 2010 सालापासून 5.4 वर्ष आहेत. 25 वर्षावरील एकूण लोकसंख्येपैकी फक्त 42% लोकांनी माध्यमिक (Secondary) शिक्षण घेतले आहे आणि भारताने 2005 ते 2014 या काळात जीडीपीच्या केवळ 3.8% रक्कम शिक्षणावर खर्च केले आहे असे या अहवालावरुन लक्षात येते.

**निष्कर्ष :-**

1) मानव विकासाची परिस्थिती निश्चीत करणारे जे निकर्ष ठरवले जातात त्यापैकी सरासरी अपेक्षित आर्युमान, दरडोई उत्पन्न या निकषावर भारताने उत्तम कामगिरी केल्याचे दिसते परंतु शिक्षणाची उपलब्धता, लिंगभावात्मक विकास व लिंगभावात्मक विषमता या आघाड्यावर भारत शेजारी राष्ट्रांच्या तुलनेतदेखील पिछाडीवर आहे.

महिलांचे आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरण, आर्थिक व्यवहारावरील महिलांचे नियंत्रण, पुरुषांच्या तुलनेत शिक्षण मिळण्याबाबत होणारा दुजाभाव या भारताच्या मानवी विकासातील प्रमुख समस्या आहेत.

256

Issue : XIII, Vol. I
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 2. 86
ISSN 2249-4081
April 2017 To Sept. 2017 45

2) मानव विकास वि.हा आर्थिक विकासातील एक महत्त्वाचा घटक आहे.
3) मानव वि.वि.पाहिल्यास तो सर्वत्र असमान आहे.
4) मानव विकास निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी मानव विकास निती यांचा समन्वय झाला पाहिजे.
5) भारताच्या मानव विकास निर्देशांकचे मूल्य 0.609 एवढे आहे, सरासरी आर्युमान, शिक्षण व दरडोई उत्पन्न या मानव विकासाच्या निर्देशांकावरुन भारत इतर उच्च दर्जा गाठणाऱ्या देशाच्या तुलनेत बराच मागे आहे.
6) 1990 ते 2015 च्या पंचवीस वर्षाच्या काळात भारत मानव विकास निर्देशांकाचे मूल्य 0.301 वरुन वाढत ते 0.609 म्हणजे दुप्पट झाले. भारताचा समावेश मध्यम मानव विकास गटात होतो. जरी भारताच्या सरासरी 72 टक्के दराने वाढ होत असली तरी मानव विकास निर्देशांकात मला त्या तुलनेत फार कमी वाढ झाले आहे. त्यामुळे भारताचा उच्च मानव विकास निर्देशांक गटात प्रवेश करण्यासाठी बराच दीर्घ कालावधी लागणार आहे.
7) मानवी विकास निर्देशांकात (एचडीआय) भारत 5 अंकानी वरच्या स्थानावर पोचला आहे. संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाच्या ताज्या आकडेवारीनुसार,वर्ष 2014 मध्ये मानवी विकास निर्देशांकाच्या क्रमवारीत भारत 130 व्या क्रमांकावर पोचला आहे.भारतीयांचे आयुर्मान व दरडोई उत्पन्न वाढल्याने देशाचे मानवी विकास निर्देशांक सूधारला आहे.
8) संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाच्या वर्ष 2015 मधील अहवालानुसार, मानवी विकास निर्देशांकाबाबत 2014 मध्ये एकुण 188 देशांच्या यादीत भारत 130 व्या क्रमांकावर होता. त्यापुर्वीच्या वर्षात (2014) भारत 135 व्या क्रमांकावर होता. भारताचे एचडीआय मूल्य 2014 मध्ये 0.609 झाले आहे. तसेच मानव विकासाच्या बाबतीत देश मध्यम श्रेणीत आला आहे. यानुसार, 1980 ते 2014 दरम्यान भारताचे एचडीआय मूल्य 0.362 वरुन 0.609 वर पोचले आहे. म्हणजेच यात 68.1 टक्के वाढ झाली आहे.
9) मानवी विकास निर्देशांकात नॉर्वे आघाडीवर आहे. त्यापाठोपाठ ऑस्ट्रेलिया व न्युझीलंड अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. बांग्लादेश व पाकिस्तान या यादीत 142 व 147 या क्रमांकावर आहेत. ब्रिक्स देशांमध्ये भारताचे स्थान सर्वात खालचे आहे.
10) एचडीआय हे देशातील मूलभूत मानवी विकास मोजण्याचे सरासरी मापक आहे. माणासाचे दीर्घ व निरोगी आयुष्य, शिक्षणाच्या संधी व चांगले राहणीमान या तीन परिमाणांच्या आधारे मानवी विकास निर्देशांक मोजला जातो.

Issue : XIII, Vol. I
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 2.86
ISSN 2249-4081
April 2017 To Sept. 2017 46

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# संदर्भ सूची :-

1. Boserup, Esther (1970) Womens Role in Economic Development New York: St.Martins Press.
2. National Human Development Report 2011 / Planning Commission, Government of India New Delhi.
3. UNDP (United Nations Development Programme) Human Development Report 2015 New York and Oxford University Press.
4. Maharashtra Human Development Report 2012 Towards Inclusive Human Devlopment Yashwantrao Chavan Academy of Development Administration Pune.
5. Governemnt of Maharashtra (2015-16) Economic Survey of Mahrashtra Deirectorate of Statisticsand Ecomonics
6. जाधव तुकाराम, महाराष्ट्र वार्षिक, 2015 बुलेटिन ऑफ युनिक अॅकॅडमी पुणे.
7. डॉ.अशोक टिपरसे (2013) मानवी विकासातील लिंग समानतेची भूमिका Male-Fefale Ratio Imbalance in india, Y.C.M.College Ambajogai
8. Dr.Ashok Tiparse (2016) Empowerment of Women and Empowerment of Nation, Women National Conference Empowerment, S.M.Shirur Anantpal, Latur .
9. Dr.Ashok Tiarse (2016) Impact of Human Development on Economic progress Arthvichar National Registered and Journal MEA

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

258